# नागपुर जिल्ह्यातील ४० रेती घाटाची पर्यावरण विषयक लोकजनसुनावणीचे इतिवृत्त दि. २६/१२/२०२२.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपुर यांनी नागपूर जिल्हयातील कन्हान, सुर, जांब, पेंच, कोलार नदीवर असलेले एकुण ४० रेतीघाट जसे की, मौदा (चिकनाघाट), किरणापूर, मोहखेडी, महालगाव-अ, महालगाव-ब, सिरसोली, गरांडा, ऐसंबा, जूनीकामठी (गाढेघाट), घाटरोहना, पालोरा, सिंगारदिप, पिपळा, वाघोडा, साहोली-ब, नयाकूंड, पारडी –क, बिना, उनगांव, नेरी, चिकना-अ(२), भामेवाडा, गोसेवाडी-अ, वाकोडी, वधना, दहाडी, साहुली-अ, चिचघाट, ईसापूर-अ, रोहणा, रामडोंगरी-अ, रामडोंगरी-ब, कोच्छी, बावणगाव-ब, करजघाट, खापापेठ, कवडस, रायवाडी, टेंभूरडोह प्रस्तावित रेतीघाटाची लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज प्राप्त झाले. त्यानुसार नागपुर जिल्ह्यातील ४० प्रस्तावित रेतीघाटाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक २६/१२/२०२२ रोजी दुपारी ११.०० वाजता बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे श्रीमती. विजया बनकर, निवासी जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री.अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते व श्री. उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी समन्वयक म्हणून काम केले. सदर सुनावणी वेबेक्स व्दारे ऑनलाईन तसेच ऑफलाईन पदधतीने घेण्यात आली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडले आहे. **(सहपत्र-१).**

## पार्श्वभूमी

मा.जिल्हाधिकारी, नागपुर यांनी रेती/वाळू निर्गमीतीचे धोरण दि. २८/०१/२०२२ नुसार ४० रेती घाट उत्खननासाठी प्रस्तावित केलेले असून जिल्हा खनिकर्म अधिकारी, नागपुर यांना विविध अनुमती घेणेकरिता प्रकल्प प्रवर्तक म्हणून नेमलेले आहे. सदर ४० रेती घाट तालुकास्तरावर मा.तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीस भुवैज्ञानिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांचे प्रतिनिधी, जलसंधारण विभागाचे प्रतिनिधी असलेल्या तालुका तांत्रिक समितीद्वारे ओपन कास्ट पध्दतीने म्हणजेच पारंपारिक पध्दतीने (घमेले, पावडे यांच्या साहाय्याने) उत्खनन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे.

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने अध्यक्षा, लोकसुनावणीचे समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा. निवासी जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर व अध्यक्षा, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

..२/-

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारीत अधिनियम दि. ०१/१२/२००९ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक २५/११/२०२२ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आल्या. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले हाते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत तक्रार वा आक्षेप म.प्र.नि.मंडळाकडे १ ईमेलद्वारे प्राप्त झाले आहे. तदनुसार, मंडळाचा आदेश क्र. ई-९५/२०२२ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-221201FTS0051 dtd. 01/12/2022 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे. **(सहपत्र-३).**

तद्नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ तथा समन्वयक यांनी प्रकल्पधारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत नागपुर जिल्ह्यातील ४० रेतीघाटाचे सादरीकरण केले. सादरीकरण झाल्यावर उपस्थित नागरीकांना आपले अभिप्राय, सूचना, आक्षेप नोंदविण्याकरीता आव्हान करण्यात आले. त्यानुसार खालील नमुद नागरीकांनी आपले अभिप्राय व्यक्त केले.

<u>कार्यवृत्त:-</u>

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**श्री.अजय काथोटे, नागपुर, जि. नागपुर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | वाहतुक गावातुन कराल कि वेगळया मार्गाची व्यवस्था करणार. वाहतुकीमुळे गावकऱ्यांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. | **धुळ नियंत्रणासाठी वाहतुकीच्या रस्त्यांवर टँकर व्दारे पाणी शिंपडण्यात येईल. गावकऱ्यांना वाळु वाहतुकीमुळे त्रास होणार नाही या करीता पर्यायी रस्त्याची व्यवस्था करण्यात येईल.** |

नागपुर जिल्ह्यातील ४० प्रस्तावित रेतीघाट करीता जाहिरात/सूचना कालावधीत प्राप्त आक्षेपांची माहिती सोबत जोडण्यात येत आहे. **(सहपत्र-४).**

मा. निवासी जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांना कळविले की, नागरीकांनी मांडलेल्या अभिप्राय व सूचना याची दखल घेण्यात येईल. त्यानंतर उपस्थित केलेल्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी करण्यात आली व नागपुर जिल्ह्यातील ४० रेती घाटाबाबत वेबेक्सवर उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व उपस्थित केलेल्या मुद्दयांची तंतोतंत इतिवृत्तात नोंद घेण्यात आली, असे कळविले. जन सुनावणी समितीचे अध्यक्षांनी जनसुनावणीचा समारोप केला. समन्वयक श्री. उमाशंकर भादुले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनिधी यांनी सर्वांचे आभार मानले, माननीय अध्यक्षा यांचे परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| **(उ. भ. भादुले)**<br>**उप-प्रादेशिक अधिकारी-१,**<br>**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**<br>**समन्वयक, लोक सुनावणी समिती** | **(अशोक करे)**<br>**प्रादेशिक अधिकारी,**<br>**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**<br>**सदस्य, लोक सुनावणी समिती** | **(विजया बनकर)**<br>**निवासी जिल्हाधिकारी तथा**<br>**अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर**<br>**व अध्यक्षा, लोक सुनावणी समिती** |

## MINUTES OF THE ENVIRONMENTAL PUBLIC HEARING OF 40 SAND GHATS IN Nagpur DISTRICT DATED 26.12.2022.

*********

District Mining Officer, Collector Office, Nagpur has submitted proposal to Maharashtra Pollution Control Board to conduct Environmental Public Hearing under provision of the EIA notification 14/09/2006 ammended thereof for 40 Sand Ghats namely Mauda (Chiknaghat), Kirnapur, Mohkhedi, Mahalgaon-A, Mahalgaon-B, Sirsoli, Garada, Yesmba, Juni Kamptee (Gadeghat), Ghat Rohna, Palora, Singardip, Pipla, Waghoda, Saholi-B, Nayakund, Pardi-C, Bina, Ungaon, Neri, Chikna-A(2), Bhamewada, Gosewadi-A, Wakodi, Wadhana, Dahadi, Sahuli-A, Chichghad, Isapur-A, Rohana, Ramdongri-A,Ramdongri-B, Kochi, Bawangaon-B, Karjghat, Khpapeth, Kawadas, Raywadi, Tembhurdoh, located on Kanhan, Sur, Jamb, Pench & Kolar River in Nagpur District.

As per proposal, Environmental Public Hearing in respect of 40 Sand Ghats in Nagpur District was conducted on 26/12/2022 under the Chairperson Smt. Vijaya Bankar, Resident Deputy Collector and Additional District Magistrate, Nagpur. Shri. Ashok Kare, Regional Officer, M.P.C. Board, Nagpur member of the public hearing panel, attended public hearing and Shri. U. B. Bhadule, Sub-Regional Officer, M.P.C.Board, Nagpur-1 act as a convener. The Public Hearing started at 11.00 a.m. at- Bachat Bhavan, Collector Office, Nagpur. The public hearing is conducted through online mode also by using webex platform. Attendance of the people present during the Public Hearing is attached as **Annexure-I.**

### BACKGROUND :

District Collector, Nagpur intends auction of sand ghats and appointed District Mining Officer, Nagpur as project proponent as per sand mining guidelines dated 28.01.2022. Total 40 sand ghats are identified by Taluka Level Technical Committee chaired by Tahsildar and Dy. Engineer, Irrigation, Junior Geologist, Directorate of Geology and Mining, Junior Geologist G.S.D.A., representative of Maharashtra Pollution Control Board for scooping of sand by manual method.

### PURPOSE AND PROCEDURE:

With permission of the Chairperson of Public Hearing, Sub-Regional Officer, MPCB, Nagpur-1 has started Public Hearing procedure by welcoming Chairperson and Members of public hearing panel, local citizens from the village and others.

The Chairperson of Public Hearing Panel informed that Public Hearing is conducted for recording views/objects/suggestions of participants regarding project and same will be submitted to the Government. Further clarifier that this panel is not empowered to take any decision for approval of project and appealed participants to express their views and suggestions.

..2/-

Sub-Regional Officer, MPCB, Nagpur-1 explained purpose of conducting this public hearing as per MoEF, GOI Notification dt. 14th September, 2006 & amended thereof. The notices for the public hearing was published in two local widely circulated news papers i.e. the 'Hitavada' (English) and 'Lokmat' (Marathi) on 25/11/2022. Copies of the same are enclosed as **Annexure-II.** As per MOEF guidelines copies of the executive summary both in English and Marathi with other information/documents were placed at various government offices & concerned grampanchayat for study of people. Suggestions, comments and objections of the public were called in writing till before the date of Public Hearing from the publication of the notice. This office has received one email regarding suggestions about sand mining. The public hearing panel was constituted vide MPC Board Office Order E-95/2022 No. BO/JD/(WPC)/PH/B-221201FTS0051 dtd. 01/12/2022 Copy of the same is enclosed as **Annexure-III.**

Thereafter, Sub-Regional Officer, Nagpur-1 and Convener requested project proponent to give their detail presentation about the project and the Environmental issues related with it. Accordingly representative of the project proponent gave detailed power point presentation of the project in local language. After detailed presentation of project proponent convener of the public hearing invited objections from participant present during online/offline public hearing.

**PROCEDDINGS:-**

**FOLLOWING MEMBERS HAVE PARTICIPATED IN PUBLIC HEARING AND RAISED QUESTIONS/COMMENTS/SUGGESTIONS. THE DETAILS ARE GIVEN BELOW;**

**Mr. Ajay Kathote, Nagpur, Dist. Nagpur**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent / MPCB. |
|---|---|---|
| 1 | He said that due to sand transportation through village roads, villagers may face dust nuisance & suggested to take measures to avoid dust nuisance. | Water will be sprinkled by tankers on sand transportation roads for dust suppression. An alternative road will be explored so that villagers will not suffer due to sand traffic. |

Smt. Vijaya Bankar, Resident Deputy Collector and Additional District Magistrate, Nagpur and Chairperson of public hearing panel, summarized the questions and queries raised by the people present during public hearing and replies given by project proponent and informed that the issues raised by the people noted & taken into proceeding of hearing and thanked all the participants. Sub-Regional Officer, MPCB, Nagpur-I extended vote of thanks to the present officials, participants & concluded public hearing with vote of the thank to the chair.

**(U. B.Bhadule)**
**Sub-Regional Officer, MPC Board, Nagpur-1 & Convener of the Public Hearing Panel**

**(Ashok Kare)**
**Regional Officer, MPC Board, Nagpur & Member of the Public Hearing Panel**

**(Vijaya Bankar)**
**Residential District Collector & Additional District Magistrate and Chairperson of the Public Hearing Panel**

नागपूर, शुक्रवार, दि. २५ नोव्हेंबर २०२२

LOKMAT. MARATHI.

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची सुचना

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपुर यांनी नागपूर जिल्हयातील कन्हान, सुर, जांब, पेंच, कोलार नदीवर असलेले एकुण 40 रेतीघाट जसे की, मौदा (चिकनाघाट), किरणापूर, मोहखेडी, महालगाव-अ, महालगाव-ब, सिरसोली, नायगांव (ठाकरे), गरांडा, ऐसंबा, जूनीकामठी (गाडेघाट), घाटरोहना, पालोरा, सिंगारदिप, पिपळा, वाघोडा, साहोली-ब, नयाकूंड, पारडी –क, बिना, वारेगांव, सानेगाव राजा, उनगांव, नेरी, चिकना-अ(2), भामेवाडा, गोसेवाडी-अ, वाकोडी, वलनी, ईसापूर-अ, रोहणा, रामडोंगरी-अ, रामडोंगरी-ब, कोच्छी, बावणगाव-ब, करजघाट, खापापेठ, कवडस, रायवाडी, टेंभूरडोह चा पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याबाबत प्रस्ताव म.प्र.नि. मंडळाकडे सादर केला आहे. सदरील प्रस्तावित प्रकल्पाकरीता भारत सरकारच्या पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्लीचे 14 सप्टेंबर, 2006 च्या अधिनियमान्वये व 01 डिसेंबर, 2009 च्या सुधारीत अधिनियमान्वये पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजीत करण्यात येत आहे.

जिल्हा खनिकर्म विभागाच्या विनंतीस अनुसरून सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक बाबींबाबत घेण्यात येत असुन सदर नियोजीत रेती घाटाच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पासंबंधी टिका-टिप्पणी, अभिप्राय किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येईल.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक सूचना, विचार,टिका,टिप्पणी, अभिप्राय तसेच आक्षेप ही जाहीरात प्रसिदध झाल्यापासुन 30 दिवसांच्या आत खालील पत्यावर नोंदविण्यात याव्यात किंवा या कार्यालयाच्या संकेत स्थळावर पाठविण्यात यावेत.

प्रादेशिक कार्यालय/उप -प्रादेशिक कार्यालय-1,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण
उदयोग भवन, 5 वा माळा सिव्हील लाईन्स, नागपुर – 440001
फोन नं. 0712-2560852 Email-ronagpur@mpcb.gov.in/sronagpur1@mpcb.gov.in

सदर जाहीर जनसुनावणी वेबेक्स ॲप व्दारे सुदधा घेण्यात येणार आहे. मौखिक किंवा लेखी आक्षेप जाहीर जन सुनावणीच्या वेळेस सुदधा नोंदविता येईल. जाहीर जनसुनावणी तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| सुनावणीचे ठिकाण | :- | बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर |
| सुनावणीची तारीख | :- | 26/12/2022. सुनावणीचे वेळ :- सकाळी 11.00 वाजता |
| मिटींग नंबर | :- | 2516 670 1860 |
| पासवर्ड | :- | 26122022 (26122022 from video systems) |
| मिटींग लिंक | :- | https://mpcb.webex.com/mpcb/j.php?MTID=m701f45be56044b3e17696f4796fe9051 |

सदर रेतीघाट प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्तावेत अभ्यासू शकतील.

1. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, 15 वा मजला, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-32.
2. सह-संचालक (जप्रनि), महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईन्ट, 3रा माळा, सायन माटुंगा स्कीम रोड नं. 8, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-22.
3. जिल्हाधिकारी कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
4. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, उदयोग भवन, 5 वा माळा, सिव्हील लाईन्स, नागपुर.
5. जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन्स, नागपुर, जि.नागपुर.
6. जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपुर.
7. उप-विभागीय अधिकारी कार्यालय-मौदा, काटोल, रामटेक, सावनेर, जि. नागपुर.
8. तहसिलदार कार्यालय- मौदा, नरखेड, पारशिवनी, कामठी, सावनेर, जि. नागपुर.
9. नगर परिषद, खापा, नगर पंचायत, मौदा, जि.नागपूर
10. ग्रामपंचायत कार्यालय- नानादेवी, पावडदौना, महालगांव, सिरसोली, नारसिंगी, गवना, गरांडा, येसंबा, गाडेघाट, घाटरोहना, पालोरा, बोरी-सिगोंरी, पिपळा, वाघोडा, डोरली, नयाकुंड, पारडी, बिना, वारेगांव, सानेगांव(राजा), नेरी(उनगांव), चिकना(बोरगांव), भामेवाडा, गोसेवाडी, वाकोडी, वलनी, ईसापूर, रोहणा, खैरी-पंजाब, कोच्छी, उमरी(जा), गडेगांव, पाटनसावंगी, रायवाडी, टेंभूरडोह, जिल्हा - नागपुर.

उप-प्रादेशिक अधिकारी-1
म.प्र.नि.मंडळ, नागपुर तथा समन्वयक,
पर्यावरणविषयकजनसुनावणी

THE TIMES OF INDIA, NAGPUR
FRIDAY, NOVEMBER 25, 2022

MAHARASHTRA

"Your Service is our Duty"

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

## NOTICE FOR ENVIRONMENTAL PUBLIC HEARING

As per Ministry of Environment and Forest, Govt of India Notification dated 14/09/2006 amended notification dated 1/12/2009. District Mining Office, Collector Office, Nagpur has requested Maharashtra Pollution Control Board to conduct Environmental Public Hearing of 40 Sand Ghats which are on Rivers such as Kanhan, Sur, Jamb, Pench and Kolar in Nagpur District. The Sand Ghats are Mauda (Chiknaghat), Kirnapur, Mohkhedi, Mahalgaon-A, Mahalgaon-B, Sirsoli, Naygaon (Thakre), Garada, Yesmba, Juni Kamptee (Gadeghat), Ghat Rohna, Palora,Singardip, Pipla, Waghoda, Saholi-B, Nayakund, Pardi-C, Bina, Waregaon, Sanegaon Raja, Ungaon, Neri, Chikna-A(2), Bhamewada, Gosewadi-A, Wakodi, Walni, Isapur-A, Rohana, Ramdongri-A,Ramdongri-B, Kochi, Bawangaon-B, Karjghat, Khpapeth, Kawadas, Raywadi, Tembhurdoh.

Views, comments, responses of the public can be field at the following address in writing since the date of publication of this notice till before the date of public hearing.

Regional Office/Sub-Regional Office-I, Maharashtra Pollution Control Board,
5th Floor, Udyog Bhawan, Civil Lines, Nagpur. 440001
Ph. No. 0721-2565308
Email :- ronagpur@mpcb.gov.in/sronagpur1@mpcb.gov.in

The Public hearing will be conducted at below address and also through online mode using webex platform and details of meeting number and Password and other details are given below. Oral and written views, responses, objections can also be presented during the public hearing to be conducted at

| | | |
|---|---|---|
| Venue | : | Bachat Bhavan, Collector Office, Nagpur. |
| Date of Public Hearing | : | 26/12/2022, |
| Time of Public Hearing | : | 11.00 am. |
| Meeting link | : | https://mpcb.webex.com/mpcb/j.php?MTID=m701f45be56044b3e17696f4796fe9051 |
| Meeting number | : | 2516 670 1860 |
| Password | : | 26122022 (26122022 from video systems) |

Copies of the summary of EIA also containing the salient features of the project both in English and Marathi and other information/documents are available at the following offices.

1) Environment Department, Govt. of Maharashtra, New Administrative Building, 15 Floor, Madam Kama Marg, Mantralaya, Mumbai -32.
2) Joint Director (Water Pollution Control), Maharashtra Pollution Control Board, Kalpataru Point, 3rd Floor, Opp. Cine Planet, Near Sion Circle, Sion (E), Mumbai-400022.
3) District Collector Office, Civil Lines, Dist-Nagpur.
4) Regional Office, M.P.C.Board, 5th Floor, Udyog Bhawan, Civil Lines, Nagpur.
5) Zilla Parishad Office, Civil Lines, Nagpur.
6) District Industries Center, Udyog Bhavan Civil lines Nagpur.
7) Sub Divisional Office, Mauda, Katol, Ramtek, Saoner, Dist – Nagpur.
8) Tahsildar, Tahsil Office, Mauda, Narkhed, Parseoni, Kamptee, Saoner, Dist – Nagpur.
9) Municipal Council, Khapa and Nagar Panchayat, Mauda, Dist.Nagpur.
10) Gram Panchayat Office, Nanadevi, Pawaddauna, Mahalgaon, Sirsoli, Narsingi, Gavna, Garanda, Yeshamba, Gadeghat, Ghatrohna, Palora, Bori-Singori, Pipla, Waghodi, Dorli, Nayakund, Pardi, Bina, Waregaon, Sanegaon(Raja), Neri(Ungaon), Chikna(Borgaon), Bhamewada, Gosewadi, Wakodi, Walni, Isapur, Rohna, Khairi-Panjab, Kochi, Umari(Ja), Gadegaon, Patansaongi, Raywadi, Tembhurdoh.

Sub-Regional Officer,
MPCB, Nagpur-I & Convener,
Environment Public Hearing